सेंन्ट्रल हिंन्दू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीचे,

**भोसला मिलिटरी कॉलेज,**

रामभूमी, नासिक—४२२००५

दिनांक २०/०९/२०२५

## <u>भारत सरकार शिष्यवृत्ती</u>

## <u>अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गासाठी</u>

- <u>सदर फॉर्म **ऑनलाईन** पध्दतीने भरण्याची अंतिम दिनांक ३०/०९/२०२५ आहे</u>.
- शैक्षणिक वर्ष **2025-26** मध्ये विदयार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज खालील दिलेल्या संकेतस्थळावर भरणे बंधनकारक आहे.
- विदयार्थ्यांनी **https://mahadbt.maharashtra.gov.in** या वेबसाईटवरुन अर्ज भरावेत.
- **विदयार्थ्यांस स्कॉलरशिप व फ्रिशिपसाठी आधारकार्ड नंबर, मोबाईल नंबर व स्टेट बॅक ऑफ इंडियाचे खाते क्रमांक <u>NPCI</u> लिंक केलेले बंधनकारक आहे.**
- सदर आधारकार्ड नंबरशी लिंक असलेले मोबाईल नंबर व स्टेट बॅक ऑफ इंडियाचे किंवा इंडीया पोस्ट बँक खाते कुठल्याही प्रकारे बंद होणार नाही किंवा बदलणार नाही तसे झाल्यास विदयार्थ्यांस स्कॉलरशिप व फ्रिशिप मिळणार नाही यांची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.
- सदर स्कॉलरशिप व फ्रिशिप फॉर्म करिता विदयार्थ्यांचा स्वतःचा मोबाईल नंबर आधार नंबर, स्टेट बॅक ऑफ इंडियाचे खाते क्रमांक, ई-मेल आय डी आवश्यक आहे. पालकांचे मोबाईल नंबर, स्टेट बॅक ऑफ इंडियाचे खाते क्रमांक किंवा सायबर कॅफेचे मोबाईल नंबर किंवा ई-मेल आय डी देवू नये.
- ऑनलाइन फॉर्म भरताना खालील **सर्व मुळ कागदपत्रे (Original Document)** स्कॅन व्दारे वेगवेगळी पी डी एफ करून 250 के बी च्या आत साईज असलेली पीडीएफ ऑनलाईन पध्दतीने अपलोड करावी.
- ऑनलाइन फॉर्म भरताना विदयार्थ्यांचा कलर फोटो (Original Document) स्कॅन व्दारे जेपीजी करून 250 के बी च्या आत साईज असलेली जेपीजी पध्दतीने अपलोड करावी.
- महाविदयालयात अर्ज जमा करतेवेळी सोबत मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी (Verification)सादर करावी. मुळ कागदपत्रे महाविदयालयात जमा होणार नाही.
- **विदयार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना अचुक माहिती भरावी तसेच कागदपत्रे अपलोड करताना सोबत दिलेल्या सुचने प्रमाणे फक्त मुळ कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावी.**
- विदयार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना चुका झाल्यास त्यास सर्वस्वी विदयार्थी जबाबदार राहील व सदर विदयार्थ्यांस स्कॉलरशिप व फ्रिशिप मिळणार नाही याची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**ऑनलाइन पध्दतीने अर्ज भरतेवेळी मुळ कागदपत्रे अपलोड करणे बंधनकारक आहे झेरॉक्स प्रत अपलोड केल्यास शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही याची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**अर्ज महविदयालयात जमा करताना Xreox copy खालील क्रमानुसार जोडून दयावीत.**

1. स्कॉलरशिप व फ्रिशिपच्या अर्जाची प्रत
2. महाविदयालयातून प्राप्त केलेली प्रवेश पावतीची प्रत .(2025-26)
3. विदयार्थ्यांचे आधार कार्ड
4. दहावी, बारावी मुळ गुणपत्रक
5. शैक्षणिक वर्ष 2024-25 चे गुणपत्रक वर्षाचे मुळ गुणपत्रक (वरिष्ठ महाविदयालयातील विदयार्थ्यांचे मुळ गुणपत्रक उपलब्ध नसल्यास मुख्य यांची स्वाक्षरी व शिक्का घेवून गुणपत्रक अपलोड करावे)
6. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी दाखला (Age & Domicile Certificate) -तहसिलदाराचा किंवा सेतु कार्यालयाने निर्गमित केलेले.
7. विदयार्थ्यांच्या बँक पासबुक STATE BANK OF INDIA / POST BANK प्रत एम आय सी आर कोड व आय एफ एस कोड सहीत. विदयार्थ्यांच्या आधारकार्ड नंबरशी लिंक (NPCI-National Payments Corporation of India) असलेले
8. शाळा सोडल्याच्या दाखल्याची मुळ प्रत
9. 31 मार्च 2026 पर्यंत वैध असलेले तहसिलदार किंवा सेतु कार्यालयाने निर्गमित केलेला वडीलांचा दाखला.( आर्थिक वर्ष -2024-25) जे विद्यार्थी प्रथम वर्ष प्रवेशित आहे. त्या विद्यार्थ्यांनी आर्थिक वर्ष २०२४–२५ चा उत्पनाचा दाखला अपलोड करणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी द्वितीय व तृतीय वर्षात प्रवेशित आहे अशा विद्यार्थ्यांनी त्यांचा प्रथम वर्षात शिष्यवृत्ती फॉर्म सोबत अपलोड केलेला उत्पनाचा दाखला अपलोड करावा
10. विदयार्थी ऑनलाईन/ ऑफलाईन वर्गास 75 टक्के उपस्थितीबाबतचे स्वयं घोषणा पत्र
11. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञा पत्र
12. बीबीए, बीएस्सी संगणकशास्त्र, एमएस्सी संगणकशास्त्र व एम सी जे वर्गासाठी जातपडताळणी प्रमाणपत्राची प्रत
13. शैक्षणिक खंड असल्याचे खंड पत्र (Gap Certificate)

- शिष्यवृत्ती व फ्रिशपसाठी अर्ज केलेल्या विदयार्थ्यांनी त्यांचा फार्म https://mahadbt.maharashtra.gov.in या पोर्टलवर वेळोवेळी लॉगीन करून तपासुन संबधीत अर्ज केलेल्या फॉर्मचा आढावा घेणे आवश्यक आहे.
- शिष्यवृत्ती व फ्रिशपसाठी अर्ज केलेल्या विदयार्थ्यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in या लॉगीन करून apply Scheme वर जावून Application ID वर क्लीक केल्यावर विदयार्थ्यांच्या फॉर्मची History दिसेल त्यानुसार विदयार्थ्यांने आपली त्रुटी असल्यास ऑनलाईन पध्दतीने त्रुटी पुर्तता विदयार्थ्यांनी करणे बंधनकारक आहे. अन्यथा शिष्यवृत्ती/फ्रिशिप न मिळाल्यास त्यास सर्वस्वी विदयार्थी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

**ऑनलाईन शिष्यवृत्ती व फ्रीशिपच्या फॉर्मसोबत सर्व मुळ कागदपत्रे अपलोड करावी. झेरॉक्स कागदपत्रे अपलोड करु नये. सर्व मुळ कागदपत्रांच्या आधारे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व फ्रीशिप फॉर्मची ऑनलाईन तपासणी होणार आहे.**

## ऑनलाईन भरलेले शिष्यवृत्ती फॉर्म व आवश्यक कागदपत्रे महाविदयालयात जमा करण्यासंबधात सविस्तर वेळापत्रक सुचना फलकावर लावण्यात येईल.

प्राचार्य
**भोसला मिलिटरी कॉलेज,**
**रामभूमी, नासिक**